मराठी
न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# स्मार्ट सिटी सुविधांच्या व्यवस्थापनात पारदर्शकतेची गरज अधोरेखित

## सिग्नल व विद्युत खांबांवर फ्लेक्सबाजी वाढली; नागरिकांकडून अपघाताचा धोका आणि नियमभंगावर कारवाईची मागणी

**पिंपरी | प्रतिनिधी**

स्मार्ट सिटीच्या नावाखाली उभारण्यात आलेल्या सार्वजनिक सुविधांचा वापर आता खासगी जाहिरातींसाठी केला जात असल्याचा धक्कादायक प्रकार पिंपळे गुरवमध्ये उघडकीस आला आहे.नागरिकांच्या करातून उभारलेले आकर्षक विद्युत दिवे आणि सिग्नलचे खांब काही व्यावसायिक संस्थांसाठी मोफत जाहिरात लावण्याचे माध्यम बनल्याचे चित्र सध्या सृष्टी चौक आणि कल्पतरू परिसरात पाहायला मिळत आहे.



याशिवाय वाहतूक चौकांमध्ये आणि सिग्नलजवळ लावण्यात आलेल्या अशा प्रकाशमान जाहिराती वाहनचालकांचे लक्ष विचलित करू शकतात. त्यामुळे अपघातांचा धोका वाढण्याची शक्यताही नाकारता येत नाही. शहर सुशोभीकरणाच्या नावाखाली सुरू असलेली ही फ्लेक्सबाजी प्रत्यक्षात शहराचे विद्रूपीकरण करत असल्याची टीका नागरिकांकडून होत आहे. आता या जाहिरातींसाठी संबंधित संस्थांनी महापालिकेची रीतसर परवानगी घेतली आहे का?, सार्वजनिक खांबांचा वापर करण्यासाठी शुल्क भरले आहे का? नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कारवाई होणार का?, असे अनेक प्रश्न उपस्थित होत आहेत. स्मार्ट सिटीच्या दिव्यांचा उजेड खासगी जाहिरातींवर पडत असताना प्रशासनाच्या नजरेसमोर हा प्रकार अंधारात कसा राहिला, याचेच नागरिकांना आश्चर्य वाटत आहे.

विशेष म्हणजे हा प्रकार केवळ सृष्टी चौकापुरता मर्यादित नाही. कल्पतरू परिसरातही वाहतूक नियंत्रणासाठी उभारलेल्या सिग्नलच्या खांबांवर जाहिरातींचे फ्लेक्स लावण्यात आले आहेत. त्यामुळे सिग्नलचे खांब आता वाहतूक व्यवस्थेऐवजी जाहिरातींचे प्रदर्शन फलक बनल्याचे चित्र दिसत आहे. स्थानिक नागरिकांच्या मते सार्वजनिक मालमत्तेचा अशा प्रकारे उघडपणे व्यावसायिक वापर होत असताना संबंधित यंत्रणा मात्र गप्प का? हा खरा प्रश्न आहे. स्मार्ट सिटीच्या सुविधांसाठी कोट्यवधी रुपयांचा खर्च केला जातो. मात्र, त्याच सुविधांचा लाभ खासगी संस्थांना मिळत असेल, तर हा सार्वजनिक निधीचा अप्रत्यक्ष गैरवापर असल्याची भावना नागरिकांमध्ये व्यक्त होत आहे.

स्मार्ट सिटी अंतर्गत उभारण्यात आलेले विद्युत दिवे, सिग्नल खांब आणि इतर सार्वजनिक सुविधा या नागरिकांच्या करातून उभारल्या जातात. त्यामुळे त्यांचा कोणत्याही खासगी किंवा व्यावसायिक वापर करण्यासाठी संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेची पूर्वपरवानगी आवश्यक असते. जाहिरात फलक लावण्यासाठी निश्चित नियम, शुल्क आणि अटी लागू असतात. वाहतूक सिग्नल, चौक किंवा रस्त्यालगत लावण्यात येणाऱ्या जाहिराती वाहनचालकांचे लक्ष विचलित होणार नाही, याचीही काळजी घेणे बंधनकारक आहे.

---

# महापालिकेत 'ग्रीन मोबिलिटी'ची सुरुवात; पदाधिकारी, अधिकाऱ्यांसाठी ईव्ही धोरण

## पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या पदाधिकारी , अधिकाऱ्यांसाठी 'इलेक्ट्रिक वाहन (EV) धोरण' राबविणार : स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या वाहनव्यवस्थेत पर्यावरणपूरक बदल घडवून आणण्यासाठी एक महत्त्वाचे आणि क्रांतिकारी पाऊल उचलण्यात येत आहे.



> **सध्या अनेक पदाधिकाऱ्यांकडे वैयक्तिक वाहने असली, तरी इलेक्ट्रिक वाहनांचा पर्याय अधिक किफायतशीर आहे. लोकप्रतिनिधींनी अशी वाहने वापरल्यास समाजात पर्यावरण संवर्धनाचा सकारात्मक संदेश जाईल आणि नागरिकांमध्येही इलेक्ट्रिक वाहनांबाबत जागरूकता व आकर्षण निर्माण होईल. महापौर आणि आयुक्त यांच्या मार्गदर्शनाखाली हे धोरण लवकरच पूर्णपणे अंमलात आणले जाईल, ज्यामुळे भविष्यात पिंपरी-चिंचवड महापालिका एक 'ग्रीन' मॉडेल म्हणून ओळखली जाईल."**
>
> **- अभिषेक बारणे, सभापती : स्थायी समिती, पिंपरी चिंचवड महापालिका.**

आगामी काळात महापालिकेच्या महापौर, आयुक्त, सर्व क्षेत्रीय अधिकारी आणि वरिष्ठ अधिकारी वर्गाच्या अधिकृत प्रवासासाठी 'इलेक्ट्रिक वाहन (EV) धोरण' निश्चित करण्यात येणार आहे. अशी माहिती स्थायी सभापती अभिषेक बारणे यांनी दिली.

शहरातील वाढते प्रदूषण कमी करणे आणि इंधनावरील खर्च मर्यादित ठेवणे या दुहेरी उद्देशातून हा निर्णय घेण्यात आला आहे. सध्या महापालिकेच्या माध्यमातून विविध पदाधिकारी आणि अधिकाऱ्यांसाठी वाहनांची सुविधा उपलब्ध करून दिली जाते. या धोरणांतर्गत आता इंधनवर चालणाऱ्या गाड्यांच्या ताफ्याऐवजी टप्प्याटप्प्याने इलेक्ट्रिक वाहनांचा समावेश केला जाणार आहे. यासाठी आवश्यकतेनुसार टाटा नेक्सॉन ईव्ही, टाटा हॅरियर ईव्ही आणि महिंद्रा ईव्ही यांसारख्या आधुनिक इलेक्ट्रिक वाहनांचा समावेश होण्याची शक्यता आहे. या उपक्रमामुळे महापालिकेची 'ग्रीन मोबिलिटी' च्या दिशेने वाटचाल सुरू होणार असून, 'ग्रीन नंबर प्लेट' असलेली ही वाहने महापालिकेच्या प्रशासकीय कारभारात आधुनिकता आणि पारदर्शकता आणतील. या धोरणाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी शहरात आवश्यक असलेल्या चार्जिंग स्टेशन्सची उभारणी आणि अन्य तांत्रिक बाबींचा आढावा प्रशासनाकडून घेतला जात आहे. हा निर्णय केवळ प्रशासकीय बदल नसून, शाश्वत शहर विकासाच्या दृष्टीने टाकलेले एक दूरदृष्टीचे पाऊल आहे, ज्यामुळे प्रदूषणमुक्त शासकीय वातावरण निर्माण होण्यास मोठी मदत होणार आहे.

या निर्णयाबाबत अधिक माहिती देताना स्थायी समितीचे सभापती अभिषेक बारणे म्हणाले की, "पिंपरी-चिंचवड हे प्रगत आणि स्मार्ट शहर आहे, त्यामुळे प्रशासनानेही काळाची पावले ओळखून पर्यावरणपूरक धोरणे स्वीकारणे गरजेचे आहे. इलेक्ट्रिक वाहनांच्या धोरणामुळे महापालिकेचा इंधन खर्च लक्षणीयरीत्या कमी होईल. तसेच, पर्यावरणाचे रक्षण करणे ही आमची जबाबदारी आहे.

# मोशी येथील गॅलेक्सी इंटरनॅशनल स्कूलचा मनमानी कारभार

## 35 लाखांचा दंड असताना केवळ 1 लाख भरून वर मुजोरी, पाठीशी घालणाऱ्या आमदारांच्या वरदहस्तामुळे संस्थाचालकांचा तोरा वाढला

**पिंपरी | प्रतिनिधी**

मोशी येथील गॅलेक्सी इंटरनॅशनल स्कूलचा मनमानी कारभार आता चव्हाट्यावर आला आहे. शाळा बंद करण्याच्या शासकीय आदेशाच मोशी बोऱ्हाडेवाडी येथील गॅलेक्सी इंटरनॅशनल स्कूलने चक्क केराची टोपली दाखवली. सदर शाळा अनाधिकृत पाणी सुरू असल्यामुळे पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या शिक्षण विभागाने तब्बल ३४ लाख ९० हजार रुपयांचा (सुमारे ३५ लाख) दंडात्मक बडगा उगारला होता. मात्र, राजकीय वरदहस्ताच्या जोरावर या शाळा व्यवस्थापनाने कायदे आणि प्रशासनाला पूर्णपणे केराची टोपली दाखवली. एकूण दंडापैकी केवळ एक लाख रुपये भरून उर्वरित ३३ लाख ९० हजार रुपयांची रक्कम थकवत शाळा व्यवस्थापनाने थेट शासनाचीच दिशाभूल केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे.




एवढी मोठी दंडात्मक कारवाई झालेली असताना आणि कोट्यवधींची रक्कम थकीत असताना, या संस्थेने आता 'गॅलेक्सी पब्लिक स्कूल' असे नावात किरकोळ बदल करून थेट पहिली ते बारावीपर्यंतची नवीन इंग्रजी माध्यमाची शाळा 'स्वयंअर्थसहाय्यित' तत्त्वावर सुरू करण्यासाठी शासनाकडे अटी व शर्तीसह मान्यता पत्र सादर केले आहे. या सर्व बेकायदेशीर प्रकारांमागे विधान परिषदेच्या एका बड्या आमदारांचा थेट वरदहस्त असल्यानेच ही शिक्षण संस्था कोणतीही भीती न बाळगता निर्धास्थपणे नियम धुडकावत कार्यरत असल्याची जोरदार चर्चा परिसरात सुरू आहे. याच राजकीय पाठबळामुळे शाळेच्या संस्थापिकेचा बोलण्याचा तोरा कमालीचा वाढला असून, सामान्य नागरिक आणि तक्रारदारांना त्यांच्या उद्धटपणाचा सामना करावा लागत आहे.

या संपूर्ण प्रकरणाची पार्श्वभूमी अशी की, मोशी बो-हाडेवाडी येथील या शाळेला आवश्यक परवानग्या नसल्याने कॉंग्रेसच्या सामाजिक न्याय विभागाचे चंद्रकांत लोंढे यांनी महापालिकेच्या शिक्षण विभागाकडे अधिकृत तक्रार दाखल केली होती. शाळेने शासन मान्यता न घेता परस्पर नवीन ठिकाणी शाळा स्थलांतरित केली आणि आवश्यक असलेली स्वमान्यताही घेतली नव्हती. या तक्रारीनंतर महापालिकेच्या शिक्षण विभागाने केलेल्या चौकशीत, शाळेने अंतिम शासन मान्यता न घेता केवळ 'शासन इरादा पत्राच्या' (LETTER OF INTENT) जोरावर शाळा सुरू ठेवल्याचे उघड झाले. नियमानुसार, इरादा पत्र प्राप्त झाल्यानंतर १८ महिन्यांच्या आत पायाभूत व भौतिक सुविधांची पूर्तता करून अंतिम शासन मान्यता घेणे बंधनकारक होते. मात्र, चौकशी समितीच्या अहवालानुसार, कोणत्याही मंजुरीशिवाय ही शाळा जून २०२५ पासून बेकायदेशीरपणे सुरूच ठेवण्यात आली.

दुसरीकडे, या आमदारांच्या दबावामुळे महापालिकेचे शिक्षण विभागाचे अधिकारीही पुढील कडक कारवाई करण्यास आणि दंडाची वसुली करण्यास प्रचंड घाबरत असल्याचे चित्र आहे, ज्यामुळे मनपाच्या एकूणच कार्यपद्धतीवर आणि भूमिकेवर आता मोठे प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे. एका लोकप्रतिनिधीच्या वरदहस्तामुळे विद्यार्थ्यांच्या भविष्याशी खेळणारी आणि शासनाला लाखो रुपयांचा चुना लावणारी ही अनधिकृत शाळा राजरोसपणे कशी सुरू राहू शकते, असा संतप्त सवाल आता नागरिकांमधून विचारला जात आहे.

> **मोशी येथील गॅलेक्सी इंटरनॅशनल स्कूलच्या शाळा व्यवस्थापनाला वेळोवेळी शाळा बंद करण्याचे आदेश देवूनही शाळा सुरु ठेवण्यात आली. तसेच आकारणी केलेला दंड ज्या शाळेने शासनाच्या कोषागारात भरला नाही, त्या शाळेला प्रतिदिन १० हजार रुपये दंडात्मक कारवाई केली होती. त्यानुसार ३४९ दिवसाचा सुमारे एकूण ३४ लाख ९० हजाराचा दंड महापालिकेच्या शिक्षण विभागाकडून आकारण्यात आला होता. परंतू, संबंधित शाळेकडून केवळ एक लाख रुपये दंडाची रक्कम भरली आहे.**
>
> **- संगीता बांगर महापालिका शिक्षणाधिकारी.**

# मोशी प्राधिकरणात चक्क नवीन कचरा डेपो मोकळ्या भूखंडांवर कचऱ्याचे साम्राज्य, नागरिक त्रस्त

## मोकळ्या भूखंडांवर बेकायदा कचरा; दुर्गंधी, डास, भटके कुत्रे, आग आणि इंद्रायणी नदी प्रदूषणाचा वाढता धोका

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवडमधील मोशी प्राधिकरणात सध्या वेगाने होणारे शहरीकरण आणि वाढत्या निवासी सोसायट्यांमुळे आधुनिकतेचे चित्र पाहायला मिळत असले, तरी येथील अंतर्गत भागाला मात्र ढिसाळ कचरा व्यवस्थापनाचे ग्रहण लागले आहे. परिसरातील मोकळ्या भूखंडांवर सध्या एवढ्या मोठ्या प्रमाणावर कचऱ्याचे ढीग साचत आहेत की, आणि त्यातच उदाहरण मोशी मध्ये पाहायला मिळत आहे. मोशी प्राधिकरणात चक्क एक अघोषित नवीन कचरा डेपोच तयार झाला आहे का? असा संतप्त भावना स्थानिक नागरिकांमधून व्यक्त होत आहे.



या समस्येला मुख्यत्वे अनधिकृत डंपिंग कारणीभूत ठरत असून, अनेक बांधकाम व्यावसायिक आणि नागरिक रात्रीच्या वेळी येथील मोकळ्या भूखंडांवर बेकायदेशीरपणे ओला-सुका कचरा आणि बांधकामाचा राडारोडा (कन्स्ट्रक्शन वेस्ट) टाकत आहेत. उघड्यावरील या कचऱ्याच्या साम्राज्यामुळे स्थानिक नागरिकांचे आरोग्य पूर्णपणे धोक्यात आले आहे. हा कचरा सडल्यामुळे परिसरात चोवीस तास प्रचंड दुर्गंधी पसरलेली असते, ज्यामुळे डासांचा प्रादुर्भाव धोका वाढला असून डेंग्यू, मलेरिया आणि श्वसनाचे गंभीर आजार, विशेषतः अस्थमाच्या रुग्णांमध्ये वाढ होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. या समस्येत आणखी भर घालत आहेत ते येथील भटक्या प्राण्यांचे कळप. कचऱ्याच्या ढिगाऱ्यांमुळे परिसरात भटके कुत्र्यांचा सुळसुळाट झाला असून, यामुळे लहान मुले आणि ज्येष्ठ नागरिकांना रस्त्यावरून चालणेही कठीण झाले आहे.

या मोकळ्या भूखंडांवरील सुक्या कचऱ्याला अनेकदा अचानक आग लागते किंवा तो नष्ट करण्यासाठी हेतुपरस्पर पेटवून दिला जातो. या आगीच्या घटनांमुळे परिसरातून निघणारा विषारी धूर थेट लोकांच्या घरांमध्ये घुसतो, ज्यामुळे नागरिकांना डोळे जळजळणे आणि गुदमरल्यासारखे होणे अशा असह्य त्रासाला सामोरे जावे लागत आहे. उन्हाळ्यात आगीच्या या घटनांमुळे हवेचे प्रदूषण वाढले आहे, तर दुसरीकडे पावसाळा सुरू होताच जलप्रदूषणाचा मोठा धोका येथे निर्माण होतो. पावसाळ्यात खुल्या भूखंडांवर साचलेल्या कचऱ्याचे दूषित पाणी जमिनीत मुरल्यामुळे परिसरातील भूजलाचे (बोअरवेलचे पाणी) स्त्रोत खराब होत आहेत, तसेच हेच रासायनिक आणि दूषित पाणी वाहून जवळच असलेल्या पवित्र इंद्रायणी नदीत मिसळत असल्याने नदीचे पाणीही प्रदूषित होत आहे. वाढत्या कचऱ्यामुळे निर्माण झालेल्या या अघोषित कचरा डेपोच्या समस्येकडे पिंपरी-चिंचवड महापालिका प्रशासन आणि संबंधित प्राधिकरण कधी गांभीर्याने पाहणार आणि नागरिकांना या नरकयातनेतून कधी मुक्त करणार, असा सवाल आता मोशीकर उपस्थित करत आहेत.

> **हा नागरिकांच्या जीवाशी खेळ आहे. प्रशासनाने याबाबत आता गांभीर्याने विचार करायला हवा. मध्यंतरी आगेच्याही दुर्घटना येथे घडल्या. आरोग्यासह इतरही नागरिक समस्या येथे उद्भवू शकतात.**
>
> **- डॉ. सुहास कांबळे, नगरसेवक**

> **या समस्येची गांभीर्याने दखल घेतली जाईल. सदर परिसर प्राधिकरणाच्या अखत्यारीत असल्यामुळे त्या संदर्भात तातडीने पालिकेकडून प्राधिकरणाला पत्रव्यवहार केला जाईल.**
>
> **- डॉ. प्रदीप ठेंगल उपायुक्त, आरोग्य व घनकचरा व्यवस्थापन पिंपरी चिंचवड पालिका**

> **लोकप्रतिनिधी आणि प्रशासनाने एकत्रित येऊन यावर तोडगा काढणे आवश्यक आहे. अन्यथा परिस्थिती हाताबाहेर जाईल आणि येथील नागरिकांचे जगणे मुश्कील होईल. आम्ही देखील याबाबत आयुक्तांना आणि पीएमआरडीएला निवेदन देणार आहोत.**
>
> **- निखिल काळकुटे सामाजिक कार्यकर्ते**

# पदाधिकाऱ्यांच्या कार्यालयांच्या नूतनीकरणावर 1.44 कोटी; स्थायी समितीची मंजुरी

## नवीन सभागृहानंतर कार्यालयांचे सुशोभीकरण, फर्निचर व अंतर्गत सजावटीची कामे; 6.80 कोटींच्या तरतुदीतून खर्च होणार

**पुणे | प्रतिनिधी**

महापालिकेची तब्बल चार वर्षांची प्रशासकीय राजवट संपुष्टात आल्यानंतर जानेवारी २०२६ मध्ये महापालिकेची निवडणूक झाली, त्यानंतर महापालिकेचे नवीन सभागृह अस्तित्वात आले. मात्र, या नव्याने आलेल्या पदाधिकाऱ्यांच्या कार्यालयांचे नुतनीकरण तसेच सुशोभिकरणाच्या कामासाठी तब्बल १.४४ कोटी रुपयांचा खर्च करण्यात आला आहे. महापालिकेच्या गुरूवारी झालेल्या स्थायी समितीच्या बैठकीत या खर्चास मान्यता देण्यात आली. स्थायी समिती अध्यक्ष श्रीनाथ भिमाले यांनी ही माहिती दिली.

या कामामध्ये मुख्य इमारतीचे प्रवेशद्वार, एंट्रन्स लॉबी, सुरक्षा कक्ष, सीसीटीव्ही कक्ष, स्वागत कक्ष, अंतर्गत सजावट, फर्निचर, रंगकाम आणि फरशी बदलण्याची कमे अशा कामांचा समावेश असल्याचे भिमाले यांनी सांगितले. महापालिकेच्या २०२६-२७ च्या अंदाजपत्रकात मुख्य इमारत आणि पार्किंग व्यवस्थेच्या सुधारणा कामांसाठी ६.८० कोटी रुपयांची तरतूद उपलब्ध असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. या निधीतून संबंधित खर्च भागविला जाणार आहे.

मागील महापालिकेची मुदत १५ मार्च २०२२ मध्ये संपली. मात्र, स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये ओबीसी आरक्षणाच्या याचिकांची सुनावणी न्यायालयात सुरू असल्याने या निवडणूका रखडल्या होत्या. मात्र, ऑक्टोबर २०२५ मध्ये न्यायालयाने निवडणूकांचा मार्ग मोकळा केल्यानंतर पुढील काही महिन्यातच निवडणूक प्रक्रीया पार पडली. मात्र, या चार वर्षांच्या कालावधीत प्रशासनाकडून पदाधिकाऱ्यांची कार्यालये बंदच होती.

तर निवडणूक निकालानंतर मोठ्या प्रमाणात पक्षीय बलबालात बदल झाल्याने काही पक्षांना मोठ्या कार्यालयांची गरज पडली. त्यानुसार, कार्यालयांमध्ये बदल करण्यात आले तसेच राजकीय पक्षांकडूनही प्रशासनाकडे काही बदलांची मागणी केली होती. त्यानुसार, हा खर्च करण्यात आल्याचे सांगण्यात येत आहे. महापालिकेची तब्बल चार वर्षांची प्रशासकीय राजवट संपुष्टात आल्यानंतर जानेवारी २०२६ मध्ये महापालिकेची निवडणूक झाली, त्यानंतर महापालिकेचे नवीन सभागृह अस्तित्वात आले. मात्र, या नव्याने आलेल्या पदाधिकाऱ्यांच्या कार्यालयांचे नुतनीकरण तसेच सुशोभिकरणाच्या कामासाठी तब्बल १.४४ कोटी रुपयांचा खर्च करण्यात आला आहे.



### चार वर्षांनंतर पुन्हा सुरू झाली कार्यालये

» मार्च २०२२ मध्ये महापालिकेची मुदत संपल्यानंतर जवळपास चार वर्षे प्रशासकीय राजवट होती. या काळात पदाधिकाऱ्यांची कार्यालये बंदच होती. जानेवारी २०२६ मधील निवडणुकांनंतर नवीन सभागृह अस्तित्वात आले. बदललेल्या राजकीय समीकरणांमुळे विविध पक्षांना नव्या कार्यालयांची आवश्यकता निर्माण झाली. त्यानुसार कार्यालयांची फेररचना, दुरुस्ती आणि सुशोभीकरणाची कामे करण्यात आल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

### कोणत्या कामांवर झाला खर्च?

» महापालिकेच्या मुख्य इमारतीतील प्रवेशद्वार, एंट्रन्स लॉबी, सुरक्षा कक्ष, सीसीटीव्ही नियंत्रण कक्ष, स्वागत कक्ष, पदाधिकाऱ्यांच्या कार्यालयांची अंतर्गत सजावट, नवीन फर्निचर, रंगकाम, फरशी बदलणे आणि अन्य दुरुस्तीच्या कामांसाठी एकूण १.४४ कोटी रुपयांचा खर्च करण्यात आला आहे. या खर्चाला स्थायी समितीने मंजुरी दिली असून तो २०२६-२७ च्या अर्थसंकल्पातील मुख्य इमारत व पार्किंग सुधारणा निधीतून करण्यात येणार आहे.

### ६.८० कोटींच्या निधीतून खर्च

» महापालिकेच्या २०२६-२७ च्या अर्थसंकल्पात मुख्य इमारतीचे आधुनिकीकरण आणि पार्किंग व्यवस्थेच्या सुधारणांसाठी ६.८० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. पदाधिकाऱ्यांच्या कार्यालयांवरील १.४४ कोटी रुपयांचा खर्च याच निधीतून केला जाणार आहे. आगामी काळात मुख्य इमारतीतील इतर सुविधा, सार्वजनिक भाग आणि प्रशासकीय पायाभूत सुविधांच्या सुधारणांची कामेही या निधीतून टप्प्याटप्प्याने पूर्ण करण्यात येणार आहेत.

# पुणे महानगरासाठी स्वच्छ हवेचे आश्वासक पाऊल

## नागरिकांना स्वच्छ हवा मिळावी, यासाठी आता 'डिसिजन सपोर्ट सिस्टीम' ही प्रणाली सुरु करण्यात आली आहे.

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे महानगराचा वेगाने विस्तार होत असल्याने नागरीकरण मोठ्या प्रमाणात वाढत आहे. यातून बांधकामे प्रचंड प्रमाणात सुरू असून, प्रदूषणात वाढ होत आहे. याच वेळी वाहनसंख्येत दिवसागणिक मोठी भर पडत आहे. त्यांचे प्रदूषणही महानगरातील हवेची पातळी खालावण्यास कारणीभूत ठरत आहे. याचबरोबर कचरा जाळण्यासह इतर कारणांनी होणाऱ्या प्रदूषणाचे प्रमाणही अधिक आहे. हे प्रदूषण कमी करून नागरिकांना स्वच्छ हवा मिळावी, यासाठी आता 'डिसिजन सपोर्ट सिस्टीम' ही प्रणाली सुरू करण्यात आली आहे. या माध्यमातून शहरातील विविध भागांतील हवा गुणवत्ता निर्देशांकाची सद्य:स्थितीतील माहिती मिळून त्यावर प्रशासनाला तातडीने उपाययोजना करणे शक्य होणार आहे.

'डिसिजन सपोर्ट सिस्टीम' प्रणालीत पुणे आणि पिंपरी-चिंचवड या महापालिका भागीदार आहेत. पुणे महानगरात सध्या विविध भागांत भारतीय उष्ण कटिबंधीय हवामानशास्त्र संस्था आणि केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाची हवेची गुणवत्तेची नोंद घेणारी केंद्रे आहेत. या केंद्राच्या माध्यमातून विविध भागांतील हवेच्या गुणवत्तेची नोंद केली जाते. या केंद्रातून मिळणाऱ्या आकडेवारीचे विश्लेषण प्रणालीद्वारे केले जाणार आहे. या विश्लेषणाच्या आधारे एखाद्या भागात प्रदूषण अधिक असल्यास संबंधित महापालिका प्रशासनाला त्या बाबत कळविले जाणार आहे. यानंतर प्रशासन त्या भागातील प्रदूषण कमी करण्यासाठी तातडीने उपाययोजना करू शकणार आहे.




### 'क्लीनर एअर बेटर लाइफ'

» कॉन्फेडरेशन ऑफ इंडियन इंडस्ट्री (सीआयआय) आणि नीती आयोग यांच्या संयुक्त विद्यमाने 'क्लीनर एअर बेटर लाइफ' हा उपक्रम गेल्या काही वर्षांपासून राबविण्यात येत आहे. शासन, उद्योग क्षेत्र, शैक्षणिक संस्था आणि सामाजिक संस्थांना एकत्र आणून नागरिकांचे जीवनमान उंचावणे आणि हवेची गुणवत्ता सुधारणे हे या उपक्रमाचे ध्येय आहे. हा उपक्रम शहरांना हवेच्या गुणवत्ता व्यवस्थापनासाठी नावीन्यपूर्ण आणि विदाआधारित उपाययोजनांचे नियोजन करण्यास मदत करतो. त्यातील पुढचे पाऊल 'डिसिजन सपोर्ट सिस्टीम' प्रणालीच्या माध्यमातून पडले आहे.

# घोरपडीतील उड्डाणपूल लवकरच होणार खुला; काम अंतिम टप्प्यात

## रेल्वेगेटवरील वाहतूक कोंडीतून नागरिकांची होणार सुटका; काम अंतिम टप्प्यात आल्याने समाधान

**पुणे | प्रतिनिधी**

घोरपडी येथील साईबाबा मंदिर रेल्वेगेट रेल्वेउड्डाणपुलाचे काम अंतिम टप्प्यात आहे. गेल्या अनेक वर्षांपासून रखडलेल्या आणि रहिवाशांसाठी प्रतीक्षेचा ठरलेला हा पूल पुढील दोन महिन्यांमध्ये वाहतुकीसाठी खुला होणार असून, त्यामुळे घोरपडी, मुंढवा, केशनवगर, कोरेगाव पार्क आणि परिसरातील नागरिकांची वर्षानुवर्षे होणारी गैरसोय कायमची दूर होणार आहे.

साईबाबा मंदिर रेल्वेगेटच्या ठिकाणी दररोज वाहतूक कोंडी होत आहे. दिवसातून अनेक वेळा रेल्वेगाड्यांच्या येण्या-जाण्यामुळे रेल्वे गेट बंद ठेवावे लागत असल्याने वाहनचालकांना मनस्ताप सहन करावा लागत आहे

सकाळ आणि संध्याकाळी गर्दीच्या वेळे या ठिकाणी वाहनांच्या लांबच-लांब रांगा लागत आहे. मात्र, आता या उड्डाणपुलाचे काम अंतिम टप्पात आले आहे. पुढील दोन महिन्यांमध्ये हा पूल वाहतुकीसाठी खुला होणार असल्याचे महापालिकेच्या प्रकल्प विभागाच्या वतीने सांगण्यात आले.



### महापालिका प्रशासनाकडून कामाला गती

» महापालिका प्रशासनाने गेल्या काही महिन्यांत या पुलाच्या कामाचा सातत्याने आढावा घेत कामाला गती दिली आहे. पुलाचे मुख्य स्ट्रक्चर उभे राहिले असून, रेल्वेलाईनच्या वर तयार केलेले गर्डर टाकण्याचे काम बाकी आहे. पुलाची सुरक्षा भिंत व इतर किरकोळ काम वेगाने सुरू आहेत.

या उड्डाणपुलाचे काम पूर्ण झाल्यावर वाहनचालकांना रेल्वेगेट उघडण्याची वाट पाहत ताटकळत थांबावे लागणार नाही. या ठिकाणी होणारी वाहतूक कोंडी सुटण्यास मदत होणार असल्याने नागरिकांतून समाधान व्यक्त होत आहे.

घोरपडी साईबाबा मंदिर रेल्वे उड्डाणपूल सुरू झाल्यानंतर घोरपडी, मुंढवा, केशवनगर, कोरेगाव पार्क, बी.टी. कवडे रस्ता तसेच सोलापूर रोडकडे जाणाऱ्या वाहनचालकांना मोठा दिलासा मिळणार आहे. रेल्वे फाटक बंद असल्यामुळे दररोज होणारी वाहतूक कोंडी आणि वेळेचा अपव्यय टळणार आहे. सकाळ-संध्याकाळच्या गर्दीच्या वेळेत प्रवास अधिक सुरळीत होईल. रुग्णवाहिका, शालेय वाहने आणि सार्वजनिक वाहतुकीलाही याचा मोठा फायदा होणार असून परिसरातील नागरिकांचा प्रवास अधिक जलद आणि सुरक्षित होईल.

साईबाबा मंदिर रेल्वेगेट परिसरातील उड्डाणपूल हा अनेक वर्षांपासून रखडलेला महत्त्वाचा प्रकल्प होता. विविध तांत्रिक अडचणी, रेल्वे विभागाशी समन्वय आणि प्रशासकीय प्रक्रियांमुळे कामाला विलंब झाला होता. त्यामुळे नागरिकांना दररोज रेल्वे फाटक उघडण्याची प्रतीक्षा करत वाहतूककोंडीचा सामना करावा लागत होता. आता प्रकल्प अंतिम टप्प्यात पोहोचल्याने पुढील दोन महिन्यांत पूल वाहतुकीसाठी खुला होणार आहे. त्यामुळे परिसरातील हजारो नागरिकांची दीर्घकाळाची प्रतीक्षा अखेर संपुष्टात येणार आहे.

> पुलाच्या कामासाठी रेल्वेलाईनच्या वरील बाजूस गर्डर टाकण्यात येणार आहे. तो साडेपाचशे टनाचा आहे. मात्र, या ठिकाणी रेल्वेगाड्या सतत ये-जा करत असतात. गर्डर टाकताना रेल्वे थांबविण्यासाठी रेल्वे प्रशासनाकडून ब्लॉक घ्यावे लागणार आहेत. हा पूल पुढील दोन महिन्यांत वाहतुकीसाठी खुला करण्याचे नियोजन आहे.
>
> - दिनकर गोजारे, मुख्य अभियंता प्रकल्प विभाग, महापालिका

> पुलाचे काम पूर्ण होण्यासाठी आम्ही सातत्याने महापालिकेकडे पाठपुरावा केला. रेल्वे गेट बंद झाल्यावर स्थानिक नागरिक, नोकरदार आणि शाळेत जाणाऱ्या मुलांची गैरसोय होत होती. मात्र, आता हा पूल लवकरच वाहतुकीसाठी खुला होणार असल्याने विद्यार्थी आणि नागरिकांची गैरसोय दूर होणार आहे.
>
> - अतुल कवडे सामाजिक कार्यकर्ते, घोरपडी

# बारामतीत अपर जिल्हाधिकारी कार्यालय स्थापनेस मान्यता; ‘या’ तालुक्यांचा कार्यक्षेत्रात होणार समावेश

## पुणे जिल्हाधिकारी कार्यालयावरील कामाचा ताण कमी करण्यासाठी राज्य शासनाचे मोठे पाऊल; नवीन रचनेनुसार तालुक्यांची विभागणी जाहीर

**पुणे | प्रतिनिधी**

जिल्ह्यात बारामती येथे अपर जिल्हाधिकारी कार्यालय स्थापन करण्यास मान्यता दिली आहे, तसेच या कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात बारामती, दौंड आणि इंदापूर या तीन तालुक्यांचा समावेश करण्यात आला आहे. याशिवाय खेड तालुक्यात महसूल विभागात वाढलेले कामकाज पाहता या तालुक्यात चाकण येथे अपर तहसील कार्यालय स्थापन होणार असून, त्याचे कार्यक्षेत्र निश्चित केले आहे. पुणे जिल्ह्यात १३ तालुके असून, जिल्ह्याचा भौगोलिक विस्तारही मोठा आहे.

त्यामुळे ग्रामीण भागातील नागरिकांना त्यांच्या कामासाठी थेट पुणे येथील जिल्हाधिकारी कार्यालय गाठावे लागते. जिल्ह्यात जमीनविषयक दावे दाखल करण्याचे प्रमाण वाढले असून, त्यांची सुनावणी एकाच अधिकाऱ्याकडे होत असल्याने दावे निकाली निघण्यास दोन ते तीन वर्षे लागतात. यामुळे पुणे जिल्ह्यासाठी नव्याने आणखी एक अपर जिल्हाधिकारी कार्यालय निर्माण करण्यास मान्यता दिली असून, ते बारामती येथे होणार आहे. या दोन्ही कार्यालयांच्या हद्दीबाबत नागरिकांकडून हरकती, सूचना मागविण्यात आल्या आहेत.



जमिनीचे अकृषिक परवाने, जमीनविषयक दाव्यांची सुनावणी, गौणखनिज, पुर्नवसन विभाग, कुळकायदा शाखा आदी विभाग हे अतिरिक्त जिल्हाधिकाऱ्यांकडे आहेत. याव्यतिरिक्त सातबारा संगणकीकरण, जिल्हा दौरा, विविध समित्यांच्या बैठकांमुळे जमीनविषयक दाव्यांवर सुनावणी घेऊन त्यावर वेळेत निर्णय देणे शक्य होत नाही. ही सर्व परिस्थिती पाहता नागरिकांचे जिल्हाधिकारी कार्यालयातील हेलपाटे कमी व्हावेत, तसेच दावे लवकर निकाली व्हावेत, यासाठीच राज्य शासनाने बारामती येथे अपर जिल्हाधिकारी कार्यालय स्थापन करण्याचा निर्णय घेतला आहे.

### कार्यालयाचे नाव – कार्यक्षेत्रातील तालुके

» बारामती अपर जिल्हाधिकारी – बारामती, दौंड, इंदापूर
» पुणे अपर जिल्हाधिकारी – पुणे शहर, आंबेगाव, खेड, मावळ, मुळशी, हवेली, शिरूर, पुरंदर, जुन्नर, भोर, राजगड

### कार्यालयाचे नाव – कार्यक्षेत्रातील मंडल कार्यालये

» चाकण तहसीलदार – चाकण, आळंदी, पिंपळगाव ता. खेड, करंजविहिरे
» खेड तहसीलदार – राजगुरूनगर, वेताळे, कडूस, कन्हेरसर, पाईट, वाडा, कुडे बु.